अतितात्काळ / अर्थसंकल्प प्राथम्य

विधानमंडळाच्या फेब्रुवारी- मार्च, २०१८ च्या अधिवेशनात सादर केलेले सन २०१७-२०१८ चे खर्चाचे पूरक वितरणपत्र.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्र. पूरक-२०१८/प्र.क्र.५६/अर्थ-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ मार्च, २०१८

परिपत्रक

सन २०१७-२०१८ या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्र **दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८** रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले. सदर पुरवणी खर्चास आता विधानसभेने मान्यता दिली आहे. दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षाच्या विनियोजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी पुरवणी विनियोजन विधेयकास मा. राज्यपालांनी संमती दिली आहे आणि ते महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१८ **(सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - २०)** म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४ **दिनांक १२ मार्च, २०१८** यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. सदर खर्चाच्या पूरक विवरणपत्रात आकस्मिकता निधीतून घेतलेल्या अग्रिमांच्या भरपाईसाठी समाविष्ट करण्यात आलेल्या पूरक मागण्याच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-एक, महाराष्ट्र, मुंबई यांना करण्यात येत आहे. **तसेच, आकस्मिकता निधीतून काढलेला निधी यापुढे आकस्मिकता निधीच्या खर्च खाती न टाकता एकत्रित निधीच्या खाती खर्ची टाकण्याच्या सूचना सर्व संबंधितांना तात्काळ देण्यात याव्यात.**

३. सर्व मंत्रालयीन विभागांना असे कळविण्यात येत आहे की, त्यांनी पुरवणी विनियोजन अधिनियमानुसार मंजूर झालेल्या पूरक मागण्यांच्या रकमांचे तात्काळ वाटप करावे. **तसेच वित्तीय अधिकाराच्या प्रत्यायोजनानुसार आवश्यक तेथे नियोजन व वित्त विभागाची मान्यता घ्यावी. याचबरोबर डिसेंबर, २०१७ व फेब्रुवारी, २०१८ च्या अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्या जर काही अटी व शर्तींच्या अधिनतेने अर्थसंकल्पीत करण्यात आल्या असतील तर त्या अटींचे विभागाने त्यांचे स्तरावर पूर्तता करुन घ्यावी व तेवढीच नस्ती आवश्यकतेनुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग / नियोजन विभागाच्या मान्यतेने वित्त विभागास संदर्भीत करावी. इतर नस्त्या वित्त/नियोजन विभागाला न पाठविता त्यांचे स्तरावर निधी वितरण करावे. तसेच सदर पुरवणी मागण्यांचा निधी, योजना / उपयोजना / कार्ये इत्यादी वर खर्च करण्यापूर्वी विभागाने महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, प्रशासकीय मान्यता आदेश व वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादी मधील अटी व शर्तीची पूर्तता करुनच खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी.**

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३१७१४०५११३४०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=16a60323ef3beff915e7cf13b9836a7df2ad6df610965aab153a71bdb81c36c1, cn=Vasant K. Patil
Date: 2018.03.17 14:07:01 +05'30'

(व. कृ.पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव.

२) मा मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३) मा. विरोधी पक्षनेता, (विधानपरिषद / विधानसभा), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
४) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७) सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली-११०००१.
९) प्रधान महालेखापाल-१/२, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर. (अधिनियमांच्या १५ प्रतींसह)
१०) प्रधान महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर. (अधिनियमांच्या २५ प्रतींसह)
११) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई. (अधिनियमांच्या ४० प्रतींसह)
१३) निवासी लेखा अधिकारी, मुंबई. (अधिनियमांच्या ५ प्रतींसह)
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती, अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.